ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ | पुणें, बुधवार तारीख ७ मार्च, १९६२ | अंक ५

## विविध माहिती

**पाकिस्तानला जर्मनीची मदत**—पश्चिम जर्मनी आणि पाकिस्तान ह्यांच्यांत आर्थिक मदतीचा करार करण्यांत आला आहे. करारांतील शर्तींना अनुसरून पश्चिम जर्मन सरकार पाकिस्तानला २५ कोटी मार्क्सचें लांब मुदतीचें कर्ज देणार आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून पाकिस्तान आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील कांहीं कारखाने उभारणार आहे. पश्चिम जर्मनीकडून पाकिस्तानला आणखीहि २२ कोटी मार्क्सचें कर्ज मिळण्याची शक्यता आहे.

**तंत्रज्ञांना नोकऱ्या देण्याची जरूरी**—इतर देशांतील तांत्रिक पद्धतीच्या बरोबर राहण्यासाठी विद्यार्थ्यांनीं तांत्रिक अभ्यासक्रमाकडे अधिक प्रमाणांत जावें अशी सूचना भारताचे गृहमंत्री श्री. लालबहादूर शास्त्री ह्यांनीं केली आहे. तांत्रिक शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्यांना नोकऱ्या देण्याची व्यवस्था झाली पाहिजे असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें. ग्यानपूर येथील तांत्रिक शिक्षणसंस्थेच्या ९ व्या वर्षदिनीं ते बोलत होते.

**जर्मनीला चहाची निर्यात**—१९६३ पासून ब्रिटन युरोपीय सामाईक बाजारपेठेंत प्रवेश करणार आहे. तेव्हांपासून जर्मनींत आयात करण्यांत येणाऱ्या चहावरील १८ टक्के जकात कमी होण्याचा संभव आहे. त्यामुळें जर्मनीला अधिक चहा निर्यात करता येण्याची शक्यता वाढेल. जर्मनींत बहुतेक लोक कॉफी पिणारे असतात. जर्मनींत चहाचा खप वाढविण्यासाठी बराच प्रचार करावा लागतो.

**युद्ध झालें तर अन्नाची साठवण**—तिसरें महायुद्ध झालें तर त्यांत अण्वस्त्रांचा उपयोग करण्यांत येईल, ह्यांत शंका नाहीं. तसें झाल्यास जगांतील अन्नाच्या सांठ्यालाहि किरणोत्सर्गाचा धोका आहे. म्हणून उत्तर ध्रुवाच्या बर्फमय प्रदेशाचा अन्नपदार्थांच्या सांठवणीसाठी शीतपेटिकेसारखा उपयोग करावा, अशी कल्पना एका अमेरिकन हवाबंद अन्नपदार्थांच्या कंपनीनें केली आहे.

**ब्रिटिश लष्कराला अद्ययावत साधनें**—अणुशक्तीचा शोध लागल्यापासून लष्कराच्या साधनांत बदल होत चालला आहे. अणुबॉंबचा स्फोट हा कांहीं अणुशक्तीचा एकमेव युद्धकालीन उपयोग नाहीं. ब्रिटिश लष्कराला इलेक्ट्रॉनिक्स शास्त्रावर आधारलेलीं अद्यावत साधनें देण्यांत आलीं आहेत. ह्या साधनामुळें लष्कराला संपूर्ण अंधारांत प्रकाशावांचून हालचाली करतां येतील. अणुयुद्धांत ह्या साधनांचा फार उपयोग होईल असें म्हणतात.

**कापूस देऊन साखर घेणार**—अमेरिकेंत कापसाचें पीक फार चांगलें आल्यामुळें कापसाचा साठा वाढला व अमेरिकन सरकारला चिंता वाटू लागली. त्यामुळें जो देश अमेरिकेकडून हा शिल्लक माल घेईल त्याच्याकडून अमेरिका साखर घेण्याची बरीच शक्यता आहे. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन भारत साखर देऊन कापूस घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

**झोतभट्ट्यांना लागणारें कच्चें लोखंड**—रुरकेला येथील पोलादाच्या कारखान्यांतील झोतभट्ट्यांना लागणारें कच्चें लोखंड तयार करण्याचा एक कारखाना उभारण्यांत येणार आहे. ह्या कारखान्याच्या उभारणीच्या कामीं जर्मनी व अमेरिका सहकार्य करणार आहेत. कारखान्याच्या उभारणीसाठीं सुमारें ४·१६ कोटी रुपये खर्च येईल. त्यांपैकीं २·५८ कोटी रुपये परदेशीय चलनाच्या रूपांत लागतील.

**खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना कर्ज**—इंटरनॅशनल फायनॅन्स कार्पोरेशनचे उपाध्यक्ष मि. रोझेन हे लवकरच भारतांत येणार आहेत. ह्या कॉर्पोरेशनतर्फें खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना कर्जें देण्यांत येतात. परंतु ह्यासंबंधीचे नियम कडक असल्यामुळें आतांपर्यंत फक्त तीन अगर चार विकासकार्यांना मदत मिळाली आहे. हे नियम जरा सैल करण्यांत येतील असा अंदाज आहे.

**कोळशाच्या जुन्या खाणी**—धनबाद जवळील दगडी कोळशाच्या तीन जुन्या खाणी पुन्हां चालू करण्याचा विचार नॅशनल कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन करीत आहे. ह्या खाणी खाजगी मालकीच्या असून ३० वर्षांपूर्वीं त्या मालकांनीं बंद केलेल्या आहेत. खाणी चालू करण्याच्या कामीं पोलंडच्या इंजिनिअर्सची मदत घेण्यांत येत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ह्या खाणींमधून ५ लाख टन कोळसा निघेल असा अंदाज आहे.

**कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील नागरिकांची बेकारी**—कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांतून उद्योगधंद्यासाठी ब्रिटनमध्यें आलेल्या लोकांत गेल्या वर्षाच्या मानानें अधिक बेकारी दिसून येत आहे. ब्रिटनच्या मजूर खात्यातर्फें सांगण्यांत आलेल्या माहितीप्रमाणें चालू महिन्यांत बेकारांचा आंकडा ३१,६७८ होता. हाच आंकडा गेल्या वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यांत १४,२८१ होता. बेकार लोकांत लिहितावाचता न येणाऱ्यांचें प्रमाणहि बरेंच असतें.

**टेलिग्राफ खात्याला लागणारें सामान**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अर्कोणम् येथें टेलिग्राफ खात्याला लागणारें साहित्य तयार करणारा कारखाना काढण्यांत येण्याचा संभव आहे. हा कारखाना सार्वजनिक मालकीचा असेल आणि त्यासाठी ४० लाख रुपये भांडवल गुंतवावें लागेल. कारखाना स्थापन झाल्यावर त्यांत १,५०० लोकांना रोजगार मिळेल. कारखान्यासाठीं १५० एकर जागा निवडण्यांत आली आहे.

**ऑस्ट्रेलिआकडून गव्हाची खरेदी**— चीननें ऑस्ट्रेलियाकडून ३ लाख टन गहूं विकत घेतला आहे. गव्हाची किंमत जाहीर करण्यांत आलेली नाहीं. परंतु एकूण किंमतीच्या १० टक्के रक्कम रोख घेण्यांत येणार असून बाकीची १२ महिन्यांत द्यावयाची आहे. ऑस्ट्रेलियाकडून मोठ्या प्रमाणावर गहू घेणाऱ्या देशांत गेलीं दोन वर्षे चीनचा पहिला अनुक्रम लागत आहे.

**खताच्या कारखान्यांना मदत**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला अमेरिकेकडून मिळणाऱ्या मदतींतून खताच्या दोन कारखान्यांना साह्य करण्यांत येणार आहे. त्यापैकी एक कारखाना विशाखापट्टम येथें काढण्यांत येणार असून तो खाजगी मालकीचा आहे. दुसरा कारखाना सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रांतील आहे. पुढील वर्षी अमेरिकेकडून ५० कोटी डॉलर्स मदत मिळणार आहे.

**मुंबई-मॉस्को विमानवहातूक**—ह्या वर्षाच्या मे महिन्यांत मुंबई–सिडने व मुंबई–मास्को ह्या हवाई मार्गावरील वाहातुकीसाठी बोइंग विमानें वापरण्याचें एअर इंडिया इंटरनॅशनलनें ठरविलें आहे. हीं विमानें जेटवर चालणारीं आहेत. कंपनीजवळ अशा प्रकारचीं ६ विमानें लवकरच असतील. लंडनला व न्यूयॉर्कला जाणारीं विमानें रोज सोडण्याचें घाटत आहे.

**कापडगिरण्यांची यंत्रसामग्री**—कापडगिरण्यांना लागणारी कांहीं प्रकारची यंत्रसामग्री रशियाकडून घेण्यांत येते. रशियाकडून होणाऱ्या यंत्रसामग्रीच्या पुरवठ्यांत लवकरच तिपटीनें वाढ होणार आहे. रशियांतील ताशकंद ह्या शहरांत कापडगिरण्यांची विविध प्रकारची यंत्रसामग्री बनविण्याचा खूप मोठा कारखाना आहे. यंत्रसामग्री अद्यावत पद्धतीची असते.

**हृदयविकाराचें कमी प्रमाण**—हृदयविकाराचें प्रमाण भारतापेक्षा इतर देशांत झपाट्यानें वाढत आहे. भारतांत मात्र अजून परिस्थिति फारशी गंभीर नाहीं. ह्याचें कारण, सर्वसामान्य हिंदी नागरिकाच्या खाण्यांत स्निग्ध पदार्थ बेताबाताचेंच असतात. श्रीमंत व सुखवस्तु लोक अधिक कसदार अन्न खातात त्यामुळें त्यांच्यांत हृदयविकाराचा रोग अधिक आढळून येतो, असें मत एका परदेशीय डॉक्टरनें व्यक्त केलें आहे.

# Notice

## Bhor State Bank Limited, Bhor.

Notice is hereby given that the 18th Ordinary General Meeting of the Shareholders of Bhor State Bank, Ltd., will be held at the registered office of the Bank, at Rajawada Chowk, Bhor (Dist. Poona) at 1-30 p. m. (S. T.) on Saturday the 31st March 1962 to transact the following business :—

(1) To receive and consider the Balance Sheet, Profit and Loss Account and the report of the Directors and Auditors for the year ended on 31st December 1961.

(2) To elect Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election.

(3) To appoint Auditors for the current year and to fix their remuneration.

(4) To transact such other business as may be allowed by the Chairman.

The following special resolutions will be moved as special resolutions immediately after the ordinary business has been disposed off :—

Special Resolution No. 1 :—To elect a Director in place of Shri. Govinddas Balkisandas Devi, who retires but being eligible, offers himself for re-election and to consider and if thought fit to pass the following resolution of which a special notice as required by section 281 of the Companies Act and the relative explanatory statement concerning which is annexed hereto as required by Section 173 of the said Act.

"Resolved that pursuant to the provisions of Section 281 and other applicable provisions (if any) of the Companies Act, 1956. Shri. Govinddas Balkisandas Devi who has attained the age of 67 years and who retires by rotation be and is hereby re-elected a Director of the Company and is hereby specially declared that the age limit for Directors prescribed under Section 280 of the said Act shall not apply to him.

### Annexture to the Notice

Explanatory Statement as required by Section 173 of the Companies Act, 1956.

In conformity with the Companies Act 1956, which came into force on the 1st April 1956, the following Explanatory Statement as required by section 173 of the aforesaid Act, sets out all material facts relating to notice No. 1 mentioned in the notice dated 27-2-1962.

In respect of Special Resolution No. 1 it is notified that Shri. G. B. Devi who retires and is eligible for re-election has attained the age of 67 years and hence he cannot be elected a Director of the Company except by a resolution in respect of which a special notice has been given in accordance with the requirements of sections 190 and 281 of the Companies Act, 1956.

The company has received such a special notice from some members notifying to move the resolution as set out in the said item.

Shri G. B. Devi, has been a Director on the Board of Directors since 1955. He is a person of wide and varied experience and during the long period of his association with the Bank, is found very useful.

By Order of the Board,

Poona, 27th Feb. 1962.

**B. A. Rajeshirke**
Acting Chief Executive Officer.

*N. B.*—(i) The share transfer books of the Bank will be closed from 22-3-62 to 12-4-62. (both days inclusive).

# अर्थ

बुधवार, ता. ७ मार्च, १९६२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

## पक्का माल निर्यात करण्याची आवश्यकता

गुजरात विद्यापीठांतील अर्थशास्त्राचे रीडर प्रा. एच. एन. पाठक ह्यांनीं अविकसित देशांच्या व्यापारासंबंधीं कांहीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. अप्रगत देशांपुढें असणारे व्यापार-विषयक प्रश्न, ह्या विषयावर ते बोलत होते. ते म्हणाले कीं, अप्रगत देशांना परदेशीय बाजारपेठांत पाय रुजवावयाचा असेल तर त्यांनीं प्राथमिक अवस्थेंत असलेला कच्चा माल निर्यात करून पुरणार नाहीं. पक्का माल व संस्कारित कच्चा माल ह्यांचीहि निर्यात करणें आवश्यक आहे. पक्का माल व औद्योगिक माल ह्यांच्या बाजारपेठा शोधाव्या लागतात, तसें कच्च्या मालाचें नाहीं. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तरीहि पक्का माल व औद्योगिक माल ह्यांच्या बाजारपेठांना महत्त्व आहे. कारण ह्या प्रकारच्या मालाच्या बाजारपेठांचा जसजसा विस्तार होत जातो तसतसा ह्या मालाची निर्यात करणाऱ्या देशांचा आर्थिक विकास होत जातो असा अनुभव आहे. देशांतील काय किंवा देशाबाहेरील काय कोणत्याहि प्रकारचा व्यापार हा नेहमींच गतिशील आढळून येतो. त्यामुळें कोणत्याहि देशाच्या आर्थिक घडामोडींना जोराची चालना मिळते. आर्थिक विकासाच्या कामीं बाजारपेठांचें महत्त्व आतां राहिलेलें नाहीं, अशी समजूत अलीकडे प्रचलित होऊं लागली आहे. परंतु व्यापारवृद्धीच्या व बाजारपेठांच्या ज्या नव्या नव्या व्यवस्था करण्यांत येत आहेत त्यावरून ही समजूत बरोबर नाहीं हें दिसून येतें. युरोपियन सामाईक बाजारपेठेची स्थापना आणि तीमध्यें प्रवेश करण्याचा ब्रिटनचा निणर्य, ह्या घटनाहि आर्थिक विकासांतील बाजारपेठांचें महत्त्व सिद्ध करतात.

## गोव्यांतील लोखंडाच्या मातीची निर्यात

भारत सरकारनें गोवा ही पोर्तुगीजांची वसाहत ताब्यांत घेतल्यापासून तेथील खनिजाच्या निर्यात व्यापारांत नवनवे प्रश्न उत्पन्न होऊं लागले आहेत. इतर कांहीं खनिजांबरोबरच गोव्यातून लोखंडाच्या मातीची निर्यात होत असे. परंतु गोव्यांतील पोर्तुगीज अंमल संपुष्टांत आल्यानंतर निर्यातींत खंड पडला आहे. लोखंडाच्या निर्यातीच्या बाबतींत सरकारचें धोरण अद्याप ठरलेलें दिसत नाहीं. जपान हा देश गोव्यांतील लोखंडाच्या खनिजाचें एक मोठें गिऱ्हाईक आहे. गेल्या वर्षी जपानमधील व्यापाऱ्यांनीं गोव्यांतून ३० लक्ष टन कच्चें लोखंड आयात केलें. त्याशिवाय चालू वर्षांत ४० लक्ष टन लोखंडाचें खनिज आयात करण्याचा करार जपानी आयात व्यापाऱ्यांनीं पोर्तुगीज सरकारशीं केला होता. गोव्यांतील लोखंडाच्या खनिजाची किंमत भारतामधील लोखंडाच्या खनिजाच्या किंमतीपेक्षा कमी होती. परंतु आतां भारतामधील किंमतीबरोबर ती येऊं लागली आहे. त्यामुळें जपानी व्यापारी अस्वस्थ झाले आहेत. दरम्यान गोव्याविरुद्ध करण्यांत आलेल्या लष्करी कारवाईचा अर्थ पाकिस्तान सरकार वेगळाच लावीत आहे. पाकिस्तान सरकार असा प्रचार करीत आहे कीं पाकिस्तानमध्यें पोलादाचा नवीन कारखाना काढण्यांत येत आहे, पण हा कारखाना उभा राहूं नये अशी भारताची इच्छा असल्यानें गोव्यावर लष्करी स्वारी करण्यांत आली. कारण पाकिस्तानच्या पोलादाच्या कारखान्याला गोव्याच्या लोखंडाच्या खाणींतून खनिज पुरविण्यांत यावयाचें होतें. पाकिस्तानची अर्थव्यवस्था सुरळीत चालूं नये, अशी भारताची इच्छा असल्याचा आरोप केला जात आहे.

## शेणाचा उपयोग करून गॅसची निर्मिति

ग्रामीण भागांतील लोकांचें जीवन अधिक समृद्ध करण्यासाठी खेड्याखेड्यांतून वीज पुरविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. तथापि, मोठ्या विद्युत् केंद्रांत तयार होणारी वीज अगदीं लहान-सहान खेड्यापर्यंत पोंचविण्याचें काम खर्चाचें व वेळाचें आहे. प्रत्येक छोट्या खेड्याला लागणारी वीज स्थानिक रीत्या निर्माण करतां आली तर तें चांगलें होईल. बैलाच्या शक्तीचा उपयोग करून वीज निर्माण करण्याचा एक प्रयत्न दिल्लीजवळील खेड्यांत करण्यांत आला होता. परंतु तो यशस्वी झाला नाहीं. खेड्यांत गुरांचें शेण सहज उपलब्ध होत असतें. त्याचा उपयोग करून गॅस उत्पन्न करणारीं यंत्रें तयार करण्याच्या एका योजनेचा भारत सरकार विचार करीत आहे. अशीं यंत्रें तयार करण्यास प्रत्येकी सुमारें ५०० रुपये खर्च येतो. शिवाय हीं यंत्रें वापरण्यास सोपी असतात. शेण कुजत चाललें म्हणजे त्यापासून मेथेन नांवाचा गॅस निघूं लागतो व जळण म्हणून त्याचा चांगला उपयोग होतो. सुमारें १०० पौंड शेण ५ किंवा ६ गुरांपासून मिळूं शकतें. त्याचा उपयोग करून ६ माणसांच्या कुटुंबाला १ दिवस पुरेल इतका मेथेन गॅस निघूं शकेल असा अंदाज आहे. ह्या गॅसचा जळणाशिवाय दिवाबत्तीसाठीहि उपयोग करतां येतो. त्याशिवाय कुजलेलें शेण अधिक नत्रयुक्त होतें आणि खत म्हणून त्याचा उपयोग होतो तो वेगळाच. समाज विकास योजना, खेड्यांचे गट आणि पंचायती ह्यांना तर गॅस निर्माण करणारीं अधिक मोठी यंत्रें वापरतां येतील. खेड्यांतील लोकांना ह्या बाबतींत आर्थिक साह्य देण्याचाहि विचार चालू आहे.

## भारताच्या अर्थव्यवस्थेला भरपूर वाव

मुंबई येथील प्रसिद्ध उद्योगपति श्री. एम. जे. वैद्य रोटरी क्लबपुढें भाषण करतांना म्हणाले कीं, भारतासारख्या लोकशाही देशांत औद्योगिक व आर्थिक विकासाला अद्याप भरपूर वाव आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा विचार करतांना सध्याच्या जागतिक आर्थिक परिस्थितीचाहि विचार करण्यांत आला पाहिजे. आर्थिक विकासाच्या दृष्टीनें भारताची परिस्थिति मजबूत आहे. परदेशीय सरकारांकडून भारताला जी तांत्रिक व आर्थिक मदत मिळत आहे त्यामुळेंच ही मजबुती आली आहे हें खरें; पण मदत मिळण्यासाठी पतहि असावी लागते हें विसरून चालणार नाहीं. पाश्चिमात्य देश भारताला देत असलेली मदत शहाण्या स्वार्थानें प्रेरित झालेली आहे. लोकशाही मार्गानें भारताचें औद्योगीकरण साधण्याचा प्रयोग यशस्वी होणें त्यांना अगत्याचें वाटतें.

## कामगाराला सर्वांत जास्त वेतन मुंबईत सर्वांत कमी वेतन आंध्रप्रदेशांत

मुंबईमधील औद्योगिक कामगाराचें वेतन इतर कोणत्याहि कामगारापेक्षा खूपच जास्त आहे. १९५८ सालाचे तुलनात्मक आंकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून असें दिसतें कीं मुंबईत प्रत्येक कामगाराला वार्षिक १,५११ रु. मिळाले. त्या खालोखाल बिहारमधील कामगाराला १,४९९ रु. आणि दिल्लींतील कामगाराला १,३६६ रु. मिळाले. सबंध भारताची सरासरी १,२१९ रु. आहे. आंध्र प्रदेशांतील कामगाराला सर्वांत कमी, म्हणजे फक्त ६८४ रु. मिळाले. खालील तक्त्यांत एकूण कामगार, त्यांना मिळालेलें एकूण वेतन आणि त्यांना प्रत्येकीं दरसाल सरासरीनें मिळालेलें वेतन, ह्यांचे तुलनात्मक आंकडे दिले आहेत:—

**वेतनामधील तफावत : १९५८**

| राज्य | औद्योगिक कामगार ('०००) | वेतन (लक्ष रु.) | प्रत्येकीं सरासरी वार्षिक वेतन रु. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. मुंबई | ५०० | ७,५५४ | १,५११ |
| २. प. बंगाल | ४२६ | ४,८२८ | १,१३३ |
| ३. मद्रास | १४५ | १,५६८ | १,०८१ |
| ४. आंध्र प्रदेश | ५५ | ३७६ | ६८४ |
| ५. उत्तर प्रदेश | १५४ | १,३८६ | ९०० |
| ६. बिहार | १०० | १,४९९ | १,४९९ |
| ७. म्हैसूर | ६० | ५४४ | ९०७ |
| ८. मध्यप्रदेश | ३२ | ३५९ | १,१२२ |
| ९. पंजाब | ३६ | ३८४ | १,०६७ |
| १०. दिल्ली | २९ | ३९६ | १,३६६ |
| ११. ओरिसा | १७ | १३४ | ७८८ |
| १२. राजस्थान | १९ | १६३ | ८५८ |
| १३. आसाम | ५ | ६० | १,२०० |
| १४. केरळ | २२ | २४१ | १,०९६ |
| एकूण | १,६०० | १९,५०० | १,२१९ |

## रंगीत फोटो घेणारी फिल्म

मध्यवर्ती सरकारचे व्यापार व उद्योगमंत्री श्री. रेड्डी ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं, रंगीत फोटो घेणारी फिल्म तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचा सरकारचा विचार आहे. कारखान्यासंबंधीचा तपशील अद्याप ठरावयाचा आहे. परंतु हा कारखाना बहुधा म्हैसूर राज्यांत काढण्यांत येईल.

## डब्ल्यू. जी. ग्रेसला बाद देणारा पंच

सुप्रसिद्ध दिवंगत क्रिकेट खेळाडू डब्ल्यू. जी. ग्रेस ह्यांच्या विरुद्ध पायचीत असा निर्णय देणारे अंपायर मि. फिलिस्टन हे आतां १०० वर्षांचे झाले आहेत. १९१२ मध्यें एका सामन्यांत त्यांनीं ग्रेस हे पायचित असल्याचा निर्णय दिला. परंतु ग्रेस ह्यांना हा निर्णय पटला नाहीं व त्यांनीं जागेवरून हलण्याचें नाकारलें. त्यामुळें सामना तसाच पुढें चालविण्यांत आला. पण गंमत अशी कीं ग्रेस ह्यांच्या वागणुकीविरुद्ध शब्दहि उच्चारण्याचें धैर्य कोणाला झालें नाहीं. क्रिकेटच्या इतिहासांत अंपायरच्या निर्णयाविरुद्ध खेळ पुढें चालविण्याचा हा एकमेव प्रसंग असावा.

## ग्रामीण भागांत शिक्षणाची वाण

स्त्री-शिक्षणासंबंधीच्या राष्ट्रीय मंडळानें भारत सरकारला अशी शिफारस केली आहे कीं, ग्रामीण भागांत काम करणाऱ्या शिक्षकांना दरसाल नेहमींच्या पगारवाढीच्या दुप्पट पगारवाढ देण्यांत यावी. सरकारनें ही शिफारस स्वीकारली आहे. मंडळाच्या अध्यक्ष श्रीमती रक्षा शरण मद्रास येथें बोलतांना म्हणाल्या कीं, स्त्रीशिक्षणाचा प्रसार झपाट्यानें होण्याच्या मार्गांत खरी अडचण स्त्री-शिक्षकांच्या तुटवड्याची आहे. एकट्या पंजाबचेंच उदाहरण घेतलें तर त्या राज्यांत १५० शाळांना शिक्षकच मिळालेले नाहींत. मध्यप्रदेशांतील स्थितीहि अशीच आहे. त्यामुळें मंडळानें केरळमधून ३० स्त्री-शिक्षकांना तात्पुरते मागून घेतलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ५० टक्के मुलींच्या शिक्षणाची सोय होईल.

## ब्रिटिश पार्लमेंटच्या सभासदांची पगारवाढीची मागणी

ब्रिटिश पार्लमेंटच्या कॉमन्स गृहांतील सभासदांनीं आपल्या वेतनांत वाढ करण्यांत यावी अशी मागणी केली आहे. सरकारचें धोरण मात्र वेतन न वाढविण्याचें आहे. सभासदांच्या वेतनाची दर पांच वर्षांनी उजळणी करण्यात येत असते. सध्या कॉमन्स सभेच्या प्रत्येक सभासदाला पगार म्हणून वार्षिक १,००० पौंड मिळतात आणि खर्चासाठी ७५० पौंड मिळतात. शिवाय त्याला आपल्या मतदार विभागांत फुकट प्रवास करतां येतो. लॉर्डांच्या सभागृहाच्या सभासदांना ते हजर राहतील त्या दिवसाचा प्रवासभत्ता व ३ पौंड देण्यात येतात. ह्या वेतनांत वाढ करण्यांत यावी म्हणून सर्व पक्षांतील कांहीं सभासद मिळून मोहीम काढणार आहेत. दरसाल १,००० पौंडांऐवजीं २,००० पौंड वेतन मिळावें अशी सभासदांची मागणी आहे. ब्रिटनमधील सनदी नोकरांना पगाराची जी श्रेणी लागू आहे, तीप्रमाणें आपणालाहि पगार मिळावा असें त्यांचें म्हणणें आहे. तसें झाल्यास पार्लमेंटच्या सभासदांचे पगार सालीना २,६५० ते ३,३५० पौंड ह्यांत बसतील. शिवाय सनदी नौकरांचे पगार वाढतील त्याच वेळीं त्यांचेहि पगार वाढतील. पगारवाढीच्या ह्या मोहिमेंत मि. रॉय मेसन ह्या मजूरपक्षाच्या सभासदानें पुढाकार घेतलेला आहे. १९५७ सालीं मि. मेसन ह्यांनीं ७७ सभासदांचें मन वळवून पगारवाढ केल्याशिवाय सभागृहाच्या कमिटीवर कामें करण्यास नकार देण्यास त्यांना प्रवृत्त केलें होतें. त्याचा परिणाम होऊन कमिटीवरील सभासदांना ७५० पौंड खर्चाचा भत्ता देण्यात आला होता. मि. मेसन व त्यांचे सहकारी ह्यांनीं फ्रान्स व इटली ह्या देशांच्या पार्लमेंटच्या सभासदांना मिळणाऱ्या वेतनाचा अभ्यास केला असून तेथील वेतन अधिक आहे, असें त्यांचें म्हणणें आहे.

## हेरगिरी करणाऱ्या वैमानिकाची जबानी

रशिअन प्रदेशावर विमानांतून हेरगिरी करणारा अमेरिकन वैमानिक फ्रॉन्सिस पॉवर्स ह्यास रशिआनें मुक्त केल्यानंतर अमेरिकेंत त्याची कसून जबानी घेण्यांत आली. परंतु रशिआंत त्याच्यावर भरलेल्या खटल्यांत त्याचें विमान पडल्याबद्दल त्यानें जी माहिती दिली होती त्यापेक्षा कोणतीहि अधिक माहिती त्याला देतां आली नाहीं. त्यामुळें रशिआंत त्याची स्मृति नष्ट अगर कमकुवत करण्यासारखें कांहींतरी करण्यांत आलें असावें असा निष्कर्ष काढण्यांत येत आहे. हा निष्कर्ष न मानला तर रशिआजवळ ६८,००० फूट उंचीवरील विमान पाडणारें अचूक अस्त्र असावें असाच निष्कर्ष काढावा लागतो. पॉवर्सचें विमान पाडण्यांत आलें त्या वेळीं तें ६८,००० फूट उंचीवरून भ्रमण करीत होतें.

### दि बेळगांव बँक लि. ची उत्कृष्ट प्रगति

दि बेळगांव बँक लि. ला गेलें वर्ष सर्वच दृष्टींनीं चांगलें गेलें. १९६१ ची १९६० साळाशीं तुलना केली असतां हें सुस्पष्ट होईल:—

| | १९६० रु. | १९६१ रु. |
|---|---|---|
| निव्वळ नफा | १,७५,८३९ | २,३२,७९६ |
| डिव्हिडंड | ९% करपात्र | १०% करपात्र |
| डिव्हिडंडला लागणारी रक्कम | ६२,८६४ | ८०,००० |
| रिझर्व्हकडे वर्ग | ४०,००० | ५०,००० |
| इन्कम् टॅक्स तरतुद | ६९,००० | ९०,००० |
| इतर तरतुदी | | ९,००० |
| ठेवी | १·७४ कोटी | १·८१ कोटी |
| इन्व्हेस्टमेंट्स | ६७ लक्ष | ७२ लक्ष |
| एकूण जिंदगी | २·१८ कोटी | २·२२ कोटी |
| स्टाफला बोनस | १ महिन्याचा पगार | १½ महिन्याचा पगार |
| शाखांची संख्या | २७ | २८ |

मजबुतीला बाध न येतां नफा उत्कृष्ट मिळविणें, हें बेळगांव बँकेचें वैशिष्ट्य आहे. १९६१ मध्यें तिनें भरपूर तरतुदी करून, स्टाफला जास्त बोनस देऊन, १९६० चे मानानें ५७ हजार रु. अधिक नफा मिळविला आहे. ९% + १% बोनस, असें १०% करपात्र डिव्हिडंड देण्यांत येणार आहे.


बँकेनें गेल्या वर्षीं माधवनगर ( जि. सांगली ) येथें शाखा सुरू केली; म्हणजे आतां शाखांची संख्या २८ झाली आहे.

### सोलापूरला विजेचा पुरवठा

कोयना विद्युत्-उत्पादन योजना पूर्ण झाली म्हणजे सोलापूर शहराला रोज ३०,००० किलोवॅट वीज पुरविण्यांत येणार आहे. त्यांपैकीं १०,००० किलोवॅट वीज शहरांतील ४ कापडाच्या गिरण्यांना देण्यांत येईल. बाकीची वीज इतर उद्योगधंद्यांना व घरगुती वापरासाठी पुरविण्यांत येईल. वीजपुरवठ्यासाठी लागणारें सबस्टेशन बांधण्यांत येत आहे.

### दोन कोटी डॉलर्स किंमतीचें मादक द्रव्य

दारूसारख्या मादक द्रव्यांचा चोरटा व्यापार अमेरिकेंत मोठ्या प्रमाणावर चालतो. कारण कांहींहि असो, पण अमेरिकेंतील कित्येक स्त्रीपुरुषांना ' हिरोइन " नांवाचें मादक द्रव्य शरीरांत स्वतःला टोंचून घेण्याचें व्यसन जडलेलें असतें. ह्या द्रव्याचें उत्पादन, खरेदी–विक्री अगर आयात ह्यांना मात्र बंदी आहे. न्यूयॉर्कमधील पोलिसांनीं एका माणसाला हें द्रव्य जवळ असल्याच्या संशयावरून अटक केली आणि त्याची झडती घेतली. झडतींत संशयिताजवळ २ कोटी डॉलर्स किंमतीचे ' हिरोइन ' सांपडलें. रुपयांत त्याची किंमत सुमारें १० कोटी रुपये होईल. फ्रान्समधून अमेरिकेंत पाठविण्यांत आलेल्या एका मोटारींत हें द्रव्य लपविण्यांत आलें होतें. पोलिसांनीं इतकी मोठी शिकार क्वचितच मिळते.



किर्लोस्कर
लोखंडी नांगर
भारी, मध्यम प्रतीच्या व रेताड जमीनीच्या सर्वोत्कृष्ट नांगरटीसाठीं निरनिराळ्या बनावटीचे लहान मोठे नांगर तयार होतात. आपल्या जमीनीच्या मगदुरा प्रमाणे योग्य अशा नांगराची निवड करा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी
(जि सांगली)

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : –श्री. वा. काळे, संपादक, ' अर्थ "
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

### ऑईल इंडिआ कंपनीचें तेलाचें उत्पादन

ऑईल इंडिआ कंपनीच्या ताब्यांत असलेल्या तेलाच्या विहिरींपासून कंपनी दरसाल सुमारें २० लाख मेट्रिक टन तेलाचें उत्पादन करू शकेल असा अंदाज आहे. ही कंपनी भारत सरकार व बर्माशेल कंपनी ह्यांच्या संयुक्त मालकीची आहे. १९६२ सालीं, ऑईल इंडिआ कंपनीतर्फे तेलाच्या आणखी ४० विहिरी खणण्यांत येणार आहेत. नूनमति व बरौनी येथील सार्वजनिक मालकीच्या तेलशुद्धीच्या कारखान्यांना अशुद्ध तेलपुरवठा करणें मग कंपनीला शक्य होईल. नूनमति कारखान्याला ऑईल इंडिआ कंपनीनें आतांपर्यंत ६८,५०० टन तेल पुरविलेलें आहे. हा सर्व पुरवठा रेल्वे वॅगन्सच्या साह्यानें करण्यांत येईल.

### गोव्यांतील सेवानिवृत्तांचें पेन्शन

पोर्तुगालच्या वसाहतींत सरकारी नौकरी करून सेवानिवृत्त झालेल्या पोर्तुगीज नोकरांना त्यांचें पेन्शन पूर्ववत् देण्याचें धोरण गोव्याच्या लष्करी राजवटीनें ठरविलें आहे. गोव्यांत सेवानिवृत्त झालेल्या सरकारी नोकरांची संख्या ९९ असून त्यांना देण्यांत येणाऱ्या पेन्शनची रक्कम सालीना २,७०,००० रुपये आहे. ह्यापैकी बहुतेक पेन्शनर्स गोव्यांत राहात आहेत. त्यांच्यापैकी ९२ जणांचीं पेन्शनें गोव्याचें सरकार देत असे आणि ७ जणांची पेन्शनें पोर्तुगालचें सरकार देत असे.

### वंशावळीचें महत्त्व एकदम पटलें

भारतामधील तीर्थक्षेत्रांत कुटुंबांच्या वंशावळी पंड्यांच्या घरीं ठेवण्यांत येत असल्याचें प्रसिद्धच आहे. इटलीमधील बॅनेटी नांव असलेल्या लोकांचें अलीकडे आपल्या वंशावळीकडे फार लक्ष लागलें आहे. बॅनेटी नांवाचा एक इसम १०० वर्षांपूर्वी मादागास्करचा राजा होता. त्यानें लंडनमधील एका बँकेंत ६०,००० लिरा म्हणजे सुमारें ३ कोटी, ४५ लाख पौंडांची मालमत्ता ठेवलेली आहे व ती त्यांच्या वारसांना मिळावयाची आहे, अशा वार्ता प्रसिद्ध झाल्याबरोबर वंशावळीचा शोध व तपासणी जारीनें चालू झाली आहे.

### सर्वस्वीं अल्युमिनमची मोटारगाडी

जपानमधील एका मोटारकारखान्यानें सर्वस्वीं अल्युमिनमची बनविलेली मोटारगाडी तयार केली आहे. गाडीची किंमत १,००० डॉलर्स म्हणजे सुमारें ५,००० रुपये ठेवण्यांत आली आहे. सामान्य प्रतीचा पगार मिळविण्याच्या जपानी नागरिकाला ती परवडेल अशी अपेक्षा आहे. गाडीचें वजन अवघें ५२५ किलोग्रॅम असून तींत ४ माणसें बसूं शकतात. गाडी दर तासाला १० किलोमीटर इतक्या वेगानें पळूं शकते. गाडीची विक्री जपानच्या बाजारपेठेंत नुकतीच सुरू झाली आहे. छोट्या मोटारगाड्या बनविण्याच्या कामीं आजवर जर्मन कारखानदारी पुढें होती. आतां जपाननें आघाडी मारल्याचें दिसतें.

### भाक्रा-नांगल धरणाचें काम

पंजाबमधील ७४० फूट उंचीच्या भाक्रा-नांगल धरणाचें काम पूर्ण होत आलें आहे. ह्या धरणाच्या बांधकामांत सुमारें ५५ लाख घनवार काँक्रीट मारण्यांत यावयाचें आहे. उजव्या बाजूवर बांधण्यात येत असलेल्या वीजकेंद्राचें कामहि व्यवस्थित चालू आहे ह्या वीजकेंद्राचें काम चालू वर्षाच्या ऑक्टोबरपर्यंत संपेल असा अंदाज आहे.


Statement about ownership and other particulars about newspaper 'ARTHA' to be published in the first issue every year after last day of February.

FORM IV

(See Rule 8)

1. Place of publication 823, Shivajinagar, Poona 4
2. Periodicity of its publication Fortnightly
3. Printer's name. S. V. Kale
   Nationality. Indian
   Address. 823, Shivajinagar, Poona 4
4. Publisher's name. S. V. Kale
   Nationality Indian
   Address. 823, Shivajinagar, Poona 4
5. Editor's name. S V. Kale
   Nationality. Indian
   Address. 823, Shivajinagar, Poona 4
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital. S V. Kale 823, Shivajinagar, Poona 4

I. Shripad Vaman Kale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 7-3-1962 S. V. Kale
Signature of Publisher.



श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें

१ दाणे आणि खडे किं. रु. २=५०

२ कौटुंबिक हितगुज किं. रु. ३=००

दि बेळगांव बँक लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

स्थापना ) (शेड्यूल्ड बँक) ( १९३०

| | | |
|---|---|---|
| विक्रीस काढलेलें, खपलेलें व वसूल भांडवल | रु. | ८,००,००० |
| एकूण गंगाजळी | रु. | ४,१०,००० |
| ठेवी | रु. | १,८४,६९,००० |
| एकूण जिंदगी | रु. | २,११,००,००० |

म्हैसूर आणि महाराष्ट्रांत पसरलेल्या २८ शाखा

मुदती ठेवी आणि कॉल डिपॉझिट्स अत्यंत आकर्षक व्याजाच्या दरानें स्वीकारलीं जातात.

बँकेच्या तीन आणि पांच वर्षे मुदतीच्या कॅश सर्टिफिकेटांवर परतफेडीच्या वेळीं अनुक्रमें ४½% व ५% व्याज पडतें.

होम सेव्हिंग्ज ठेवी ३% दरानें स्वीकारल्या जातात.

एका वर्षाच्या आणि पांच वर्षांच्या मुदती ठेवींवर किमान व्याज अनुक्रमें ४% आणि ५%

बँकेला १९६१ सालीं २,२८,८२१ रु. १४ न. पैसे, म्हणजे पूर्वीच्या वर्षापेक्षा ५७,०९७ रु. ८३ न. पैसे जास्त नफा झाला. वाढलेल्या १०% करपात्र दरानें डिव्हिडंड वांटण्याचा बँकेचा इरादा आहे.

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अ. रा. नाईक,
बी. ए., बी. एससी., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर

## अवार्डच्या अंमलबजावणीची मुदत कोणत्या तारखेपासून मोजायची ?

### सहकारी कायद्याबाबत महत्त्वाचा निर्णय

बाँबे को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्टाच्या ५४ व्या कलमान्वयें केलेल्या अवार्डच्या अंमलबजावणीची मुदत कुठून मोजायची ? अवार्ड ज्या तारखेला दिलें असेल, त्या तारखेपासून का रजिस्ट्रारनें ५९ ( १ ) कलमान्वयें सर्टीफिकेट दिलें असेल, त्या तारखेपासून ? ह्या महत्त्वाच्या मुद्यावर गुजरात हायकोर्टानें नुकताच निर्णय दिला आहे.

गजानंद सहकारी पेढी लि. आणि तिचा एक सभासद रहरी खोदा मेसुर ह्यांच्यांतील तंटा रजिस्ट्रारकडे सोंपविण्यांत आला. रजिस्ट्रारच्या नॉमिनीनें २८ एप्रिल, १९४२ रोजीं ह्या सभासदाविरुद्ध निवाडा केला. सुमारें ११ वर्षांनीं म्हणजे, ७ एप्रिल, १९५३ रोजीं सोसायटीनें रजिस्ट्रारकडून त्या अवार्डबाबत सर्टीफिकेट मिळविलें. ५९ ( १ ) कलमाप्रमाणें, अशा सर्टीफिकेटावर सही झाली, म्हणजे अवार्डला सिव्हिल कोर्टाच्या हुकूमनाम्याचा दर्जा प्राप्त होतो; त्या हुकूमनाम्याप्रमाणेंच ह्या अवार्डची अंमलबजाणी करतां येते.

सोसायटीनें रजिस्ट्रारचें सर्टीफिकेट मिळवून अंमलबजावणीच्या कारवाईस प्रारंभ केला. तेव्हां आरंभीं नमूद केलेला प्रश्न उपस्थित झाला. गुजरात हायकोर्टाच्या निवाड्याप्रमाणें २८ एप्रिल, १९४२ ह्या तारखेचें अवार्ड असलें तरी ज्या दिवशीं रजिस्ट्रारनें सर्टीफिकिटावर सही केली त्या दिवशीं म्हणजे ७ एप्रिल, १९५३ रोजीं अवार्डला सिव्हिल कोर्टाच्या हुकूमनाम्याचा दर्जा प्राप्त झाला.

अवार्ड झाल्यानंतर किती मुदतींत त्याचें सर्टीफिकेट देण्यांत आलें पाहिजे, ह्याबाबत कायद्यानें निर्बंध घातलेला नाहीं. सर्टीफिकेटच्या तारखेनंतर १२ वर्षांच्या आंत हुकूमनाम्याची बजावणी केली, तर ती कायदेशीरच होईल. तेव्हां सोसायटीनें अवार्डच्या अंमलबजावणीसाठी केलेला अर्ज मुदतींत आहे.

---

### गोव्याचें नवें वर्ष आपल्याप्रमाणेंच होणार

गोव्यांतील आर्थिक वर्ष ह्यापुढें भारताप्रमाणें १ एप्रिल रोजीं सुरू होईल; पूर्वी तें १ जानेवारीला सुरू होत असे. येत्या १ एप्रिलपासून सर्व सरकारी हिशेब रुपयांत लिहिले जातील; एस्कुडोचें चलन बंद होईल. स्टेट बँकेच्या सर्व शाखा सहा एस्कुडोजला एक रुपया, ह्या अधिकृत दरानें एस्कुडो घेत आहेत. अशा रीतीनें जुनें पोर्तुगीज चलन व्यवहारांतून काढून घेतलें जात आहे. मार्मागोवा येथें स्टेट बँकेची शाखा २१ फेब्रुवारीला सुरू झाली; २४ फेब्रुवारी रोजीं मापुका शाखा उघडण्यांत आली. अशा रीतीनें, स्टेट बँकेच्या चार शाखा गोव्यांत सुरू आहेत.

---


५०

वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



★ सुवर्ण–महोत्सवी वर्ष ★

**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई**

( दि विदर्भ सहकारी बँक लिमिटेड सम्मीलित )

| मुख्य कचेरी– | विभागीय कचेरी– |
| --- | --- |
| ९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई | महाल–नागपूर |
| टेलिफोन नं. २५५४७४–७५ | तारेचा पत्ता– फार्मर बँक |

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रुझ

: नागपूर विभागांतर्गत शाखा :

(१) सिताबर्डी (२) अमरावती (३) चांदा (४) मलकापूर (५) खामगांव (६) बुलढाणा

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.


| | |
| --- | --- |
| भरपाई झालेलें भांडवल | रु. ३ कोटी, ६० लाख |
| गंगाजळी व फंड | रु. १ कोटी, ४ लाख |
| ठेवी | रु. १९ कोटी, १० लाख |
| खेळतें भांडवल | रु. ५४ कोटी, ८६ लाख |

*महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.*

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.






वेडेकर

मसाले, लोणचीं व पापड

आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.

वापरून पाहा.

गुगभाट, मुंबई ४.

शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

## चेक 'डिसऑनर' झाला, तरी धनकोला मुदतवाढ मिळते

**( मध्यप्रदेश हायकोर्टाचा निवाडा )**

गोरीलाल बलदेवदास या इसमानें ता. ११-६-१९५२ रोजीं रामजीलाल भूरालाल या इसमास नगदीं १००० रुपये कर्जाऊ दिले. ता. १०-७-१९५३ रोजीं रामजीलालनें आपल्या हातानें एक हजार रुपयांचा चेक लिहून तो गोरीलालला दिला. गोरीलालनें तो चेक बँकेंत नेऊन दिला. परंतु बँकेनें तो चेक डिसऑनर ( Dishonour ) केला. ती घटना ता. १८-७-५३ रोजीं घडली. मुद्दल १००० रुपये आणि त्यावरील व्याज याकरिता ता. ११-५-१९५६ रोजीं गोरीलालनें रामजीलाल विरुद्ध दावा आणला. कर्ज दिल्यातारखेपासून मुदत मोजल्यास दावा मुदतबाह्य होता; परंतु वादी गोरीलालचें म्हणणें असें होतें कीं, मुदतीच्या कायद्याच्या ( Limitation Act ) क. २० खालीं चेक देणें हें "पैसे देणें" ( Payment ) या सदरांत येते आणि चेक दिल्यातारखेपासून वादीला नवी मुदत मिळते. चेक दिल्याची तारीख १०-७-१९५३ होती. त्या तारखेपासून मुदत मोजल्यास गोरीलालनें ता. ११-५-१९५६ रोजीं आणलेला दावा मुदतींत होता.

अव्वल कोर्टानें वादीचें म्हणणें मान्य करून त्याचा दावा मंजूर केला. यावर रामजीलालनें ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज्जाकडे अपील केलें. ऋणकोनें आपल्या हातानें लिहून दिलेला चेक हा मुदतीच्या कायद्याच्या क. २० खालीं कर्जाची मान्यता ( Acknowledgment ) होऊं शकत नाहीं आणि चेक बँकेकडून ऑनर झाल्याखेरीज चेक दिल्यातारखेपासून धनकोला नवी मुदत मिळत नाहीं. प्रस्तुत मामल्यांतील चेक बँकेकडून डिसऑनर झाल्यामुळें गोरीलालनें चेक दिल्यातारखेपासून नवी मुदत मिळत नाहीं आणि म्हणून त्याचा दावा मुदतबाह्य आहे असा निकाल देऊन ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज्जानें गोरीलालाचा दावा खारीज केला. यावर गोरीलालनें हायकोर्टांत अपील केलें.

ऋणकोनें आपल्या हातानें चेक लिहून तो धनकोला दिला परंतु तो जर बँकेकडून डिसऑनर झाला तर दावा आणण्याकरितां धनकोला नवी मुदत मिळते काय, हा हायकोर्टापुढील मुख्य प्रश्न होता.

हायकोर्टांत गोरीलालतर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, 'चेक देणें हें पैसे देणें ( Payment ) या सदरांत येते आणि चेक जरी बँकेकडून डिसऑनर झाला तरी मुदतीच्या कायद्याच्या क. २० खालीं चेक दिल्यातारखेपासून धनकोला नवी मुदत मिळते.

हा युक्तिवाद हायकोर्टानें मान्य केला. ऋणकोनें जर आपल्या हातानें चेक लिहून तो धनकोला दिला आणि धनकोनें तो स्वीकारला तर मुदतीच्या कायद्याच्या क. २० खालीं ते 'पैसे देणें' या सदरांत येते आणि दाव्याकरितां त्या क्षणापासून नव्या मुदतीला सुरवात होते. तो चेक जरी पुढें बँकेकडून डिसऑनर झाला तरी त्यामुळें नवीन मिळालेल्या मुदतीला बाध येत नाहीं.

वरीलप्रमाणें निकाल देऊन हायकोर्टानें गोरीलालचें अपील मंजूर केलें.

—न्यायबोध

### अष्टग्रहीचें अर्थशास्त्र

अष्टग्रहीच्या दुष्परिणामापासून बचाव करण्यासाठी भारतानें सुमारें २० कोटी रु. खर्च केले, असा "इकॉनॉमिस्ट" चा अंदाज आहे. १०,००० पेक्षा जास्त यज्ञ करण्यांत आले; मुंबईमधील एक यज्ञ नऊ दिवस चालला होता आणि त्यावर २० लक्ष रु. खर्च झाले. कांहीं यज्ञ २१ दिवस चालू होते; बनारसमधील एक यज्ञ तर ९० दिवस चालू होता. मुंबईमधील कॉटन एक्सचेंजमधले दलाल भगवीं वस्त्रें परिधान केलेल्या साधूंना आपल्या चेंबर्समध्यें नेत असल्याचें दृश्य दररोज दिसत होतें. विमा कंपन्यांना खूप काम मिळालें. कांहीं ठिकाणीं मालमत्तेच्या किंमती उतरल्या; कारखान्यांतील व कचेरींतील गैरहजेरीचें प्रमाण वाढलें. नफेबाजीसाठीं हपापलेले सटोडिया आणि त्यांचे ज्योतिषी सल्लागार ह्यांनीं कटच केला असला पाहिजे असा दाट संशय वाटतो.

### गोव्यांत बँक ऑफ इंडियाची शाखा

बँक ऑफ इंडिया गोव्यांत वास्को डि गामा येथें आपली एक शाखा दि. ७ मार्च रोजीं सुरू करीत आहे. ही शाखा फॉरीन एक्सचेंजसकट सर्व प्रकारचे व्यवहार करील. स्टेट बँकेनें आतांपर्यंत गोव्यांत चार शाखा उघडल्या असून तिची वास्को डि गामा येथेंहि एक शाखा आहे.

### रेडिओ व्हॉल्व्हच्या उत्पादनांतील यश

भारत इलेक्ट्रॉनिक्स ह्या सरकारी मालकीच्या कारखान्यानें आतां-पर्यंत १० लाख रेडिओ व्हाल्व्हसचें उत्पादन केलें. उत्पादनाची ही मर्यादा कारखान्यानें ठरलेल्या वेळेपेक्षा लवकर गाठली. हा कारखाना सुप्रसिद्ध फिलिप्स ह्या डच कंपनीच्या सहकार्यानें काढण्यांत आलेला आहे. १९६० च्या नोव्हेंबर पासून कारखान्यांत व्हाल्व्हसचें उत्पादन करण्यास प्रारंभ झाला. उत्पादनाचें दुसऱ्या वर्षांत १० लाखांचें उद्दिष्ट गांठण्याचें पहिल्यानें ठरविण्यांत आलें होतें. हें उत्पादन लवकर साध्य झाल्यामुळें दुसऱ्या वर्षांत २० लाख व्हाल्व्हसचें उत्पादन करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. भारताला लागणाऱ्या व्हॉल्व्हसच्या एकूण पुरवठ्यापैकी फक्त एक तृतिअंश पुरवठाच ह्या कारखान्यातर्फे होऊ शकतो.

### दाणे आणि खडे

( लेखक:—श्री. श्री. वा. काळे, प्रकाशक—व्हीनस प्रकाशन, ४१०, शनिवार पेठ, पुणें, किं. रु. २.५० ) श्री. श्री. वा. काळे यांच्या विवेचक लेखांचा हा संग्रह एखाद्या उत्कृष्ट कथा-कादंबरी इतकाच चित्तवेधक आहे. समाजांत प्रत्यहीं भेटणाऱ्या माणसांतून अनुभवानेंच दाणे व खडे ओळखून काढता येतात. बारीक व सुगंधी तांदुळांत मिसळलेले गारगोटीचे तितकेच बारीक खडे निवडणें सोपें नाहीं. वाचकांपैकी प्रत्येकाला स्वतःच्याहि स्वभावां-तील खडे वेंचून काढावयास ह्या पुस्तकाची फार मदत होईल.

### कौटुंबिक हितगुज

( लेखक:—श्री. श्री. वा. काळे, प्रकाशक—किर्लोस्कर प्रेस प्रकाशन, पुणें. किं. रु. ३/- ) किर्लोस्कर मासिकांतून प्रकाशित होत असतांना अत्यंत लोकप्रिय झालेलें कौटुंबिक हितगुज पुस्तक-रूपानें एकत्र झालें आहे. वाढदिवस किंवा विवाहाचे वेळीं भेट देण्यालायक हें पुस्तक आहे असें म्हटलें तरी त्याची उपयुक्तता लक्षांत येईल. जीवनांत येणाऱ्या अडचणीं व अटीतटीच्या प्रसंगां-तून केवळ समजूतदारपणानें पार पडावयास ह्या पुस्तकाचें मार्ग-दर्शन खचित होईल.

—उद्यम १-३-१९६२

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.